**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**रविवार, दिनांक : ७ जुलै, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात काल दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत अकोला जिल्ह्यातील सैनिक प्रवीण जंजाळ यांना वीरमरण.**

2. **केंद्रीय अर्थसंकल्प 2024-25 साठी अर्थसंकल्पपूर्व विचारविमर्श बैठकांचा समारोप-२३ जुलै रोजी सादर होणार अर्थसंकल्प.**

3. **वेदिक -महिंद्रा कौशल्य विकास केंद्राचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज उदघाटन - अद्यावत ट्रॉली बस लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे सुतोवाच.**

4. **आषाढी एकादशीनिमित्त नागपूर-मिरज-नागपूर दरम्यान ४ 'पंढरपूर आषाढी एकादशी विशेष' गाड्या चालवण्याचा मध्य रेल्वेचा निर्णय.**

#####

**शहीद प्रवीण जंजाळ-डेस्क**

"हुतात्मा होणं हा शेवट नसून ती एका शौर्यगाथेची सुरुवात असते" ही भावना अधोरेखित करत जम्मू-काश्मीरमध्ये काल हौतात्म्य प्राप्त झालेल्या जवानांना आदरांजली वाहण्यात आली. जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात काल झालेल्या दोन वेगवेगळ्या चकमकीत चार दहशतवादी ठार झाले. दक्षिण काश्मीर जिल्ह्यातील फ्रिसल चिन्निगाम आणि मोडरगाम भागात या चकमकी झाल्या. या चकमकींमध्ये सुरक्षा दलाच्या लान्स नाईक प्रदीप कुमार आणि अकोल्याचे शिपाई प्रवीण प्रभाकर जंजाळ या दोन जवानांना वीरमरण आलं. आज चिनार कॉर्प्स कमांडर, जम्मू-काश्मीरचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि इतर मान्यवरांनी, प्रदीप कुमार आणि प्रवीण जंजाळ या शहीदांना एका कार्यक्रमात श्रद्धांजली वाहिली. चिनार वॉरियर्सने दोन्ही शूर जवानांच्या शौर्याला आणि बलिदानाला सलाम करत शोकग्रस्त कुटुंबांसोबत एकजुटीने उभे राहत त्यांच्या कल्याणासाठी वचनबद्ध असल्याचीजाणीव अधोरेखित केली. दरम्यान शहीद प्रवीण जंजाळ याचं पार्थिव आज नागपूरला आणण्यात येईल. त्यानंतर ते त्यांच्या मूळगावी-मोरगाव भाकरे इथं नेण्यात येईल. तिथं शासकीय आणि लष्करी इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. प्रवीण जंजाळ हे २, महार रेजिमेंटचे शिपाई होते. 2019 मध्ये प्रवीण जंजाळ हे भारतीय सैन्य दलात दाखल झाले. काल मोडरगम इथल्या चकमकीत चौघांना ठार केल्यानंतर

दहशतवाद्यांकडून करण्यात आलेल्या अंधाधुंद गोळीबारात प्रवीण यांच्या डोक्याला गोळी लागल्याची माहिती रेजिमेंटनं त्यांच्या कुटुंबियांना कळवली आहे.

**मंत्री निर्मला सीतारामन**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलैपासून सुरू होणार असल्याची माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रीजिजू यांनी समाज माध्यमावरल्या पोस्टद्वारे दिली आहे. अर्थमंत्री

निर्मला सीतारामन २३ जुलैला लोकसभेत २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करतील. १२ ऑगस्टपर्यंत हे अधिवेशन सुरू राहणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतरचा हा पहिलाच अर्थसंकल्प असेल. दरम्यान केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर 19 जून पासून केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली अर्थ मंत्रालयात सुरू झालेल्या अर्थसंकल्पपूर्व विचारविमर्श बैठकांचा  5 जुलै रोजी समारोप झाला.

वैयक्तिक स्तरावर विचारविमर्श करताना, संबंधित 10 गटांमधील 120 हून अधिक निमंत्रित, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि कृषी अर्थशास्त्रज्ञ आणि तज्ञ, कामगार संघटना, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्र, रोजगार आणि कौशल्य, सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग; व्यापार आणि सेवा, उद्योग, अर्थतज्ञ, वित्तीय क्षेत्र आणि भांडवली बाजारासह पायाभूत सुविधा क्षेत्र, ऊर्जा आणि शहरी क्षेत्रांचे प्रतिनिधी या बैठकांमध्ये सहभागी झाले होते. त्यांच्या सूचनांची अर्थसंकल्प तयार करतांना दखल घेतली जाईल असं प्रतिपादन करत सीतारामन यांनी सर्व सहभागींचे आभार मानले आहेत.

**जगन्नाथ यात्रा**

"आम्ही महाप्रभू जगन्नाथ यांना अभिवादन करत आहोत आणि त्यांचे आशिर्वाद सदैव आमच्या पाठीशी राहू देत" अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी  जगन्नाथ यांच्या पवित्र रथयात्रेनिमित्त  समाजमाध्यमवरून जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रत्येक वर्षी आषाढ  महिन्यातील शुल्क पक्षाच्या द्वितीयेला  ओदिशात  पुरी इथं  भगवान जगन्नाथ रथ यात्रा काढली जाते. या रथ यात्रेला मोठ्या संख्येने भाविक गर्दी करतात.  यंदा रथ यात्रा आज ७ जुलै रोजी  सुरू झाली असून  ही रथ यात्रा ९ दिवसांनी म्हणजेच १६ जुलैला पूर्ण होणार आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या वार्षिक उत्सवात सामील होणार आहेत.  ओदिशा राज्य सरकारने रथयात्रेसाठी आज आणि उद्या अशी दोन दिवसांची सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.

**मुख्यमंत्री नागपुरात**

मुंबईमध्ये घडलेल्या हिट अँड रन घटनेमध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. कायदा सर्वांसाठी समान आहे. योग्य ती कारवाई या प्रकरणात केली जाईल असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नागपूर मध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना दिलं .

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मातोश्रीच्या निधनानंतर त्यांची सांत्वन पर भेट घेण्याकरिता मुख्यमंत्री नागपुरात आले आहेत.

**एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा तिढा कायम**

एसटी कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन संपा नंतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाला व खर्चाला कमी पडणारी रक्कम राज्य शासन देईल असं न्यायालयात कबूल करण्यात आलं होतं.

त्या नंतर परिपत्रक काढताना मात्र एक वर्षच निधी देण्याचे परिपत्रक शासनाने प्रसारित केले. राज्य शासनाच्या चुकीच्या भुमिकेमुळे एसटीच्या ८७ हजार कर्मचाऱ्यांचे जून महिन्याचे वेतन रखडण्याची शक्यता निर्माण झाली असून वेतन उशिरा झाल्यास त्याला केवळ राज्य सरकारची बनवा बनवी कारणीभूत असल्याचा आरोप महाराष्ट्र एस. टी. कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे. आज नागपूर दौऱ्यावर आले असताना त्यांनी ही माहिती दिली.

एसटीला चालनिय खर्चासाठी व वेतनासाठी खास बाब म्हणून सरकारने तात्काळ निधी द्यावा, अशी मागणीही बरगे यांनी केली आहे.

**खासदार प्रतिभा धानोरकर**

चंद्रपूर जिल्हा हा शांतता प्रिय जिल्हा म्हणून ओळखला जातो. परंतु अलिकडे गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत चालली आहे. या वाढत्या गुन्हेगारी बद्दल चिंता व्यक्त करीत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी उपमुख्यमंत्री तथा गृह मंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून गुन्हेगारीवर आढा घालण्याची मागणी केली आहे.

**कृषी पंपासाठी वीजजोडणी**

महावितरणने नवीन कृषी पंपासाठी वीजजोडणी करणारी यंत्रणा उभारून देण्याची योजना एप्रिलपासून संपुष्टात आणली आहे. महावितरणच्या साईटवर यासाठीचा अर्ज उपलब्ध नाही. विजेवर चालणाऱ्या कृषी पंपाला सौर कृषी पंपाचा पर्याय निर्माण झाला आहे. त्यामुळे कृषी पंपासाठी नवीन जोडणी करून देण्याची योजना बंद केली आहे, असं हिंदुस्थान समाचार या वृत्त संस्थेनं सांगितलं आहे.

**नितीन गडकरी**

विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रीज असोसिएशन, महिंद्रा ट्रॅक्टर्स, यंत्र इंडिया लिमिटेड यांनी संयुक्तपणे स्थापित केलेले वेदिक-महिंिंद्रा कौशल्य विकास केंद्र हे कौशल्य निर्मिती व रोजगारक्षम मनुष्यबळ निर्मितीचे केंद्र ठरेल. विदर्भात मोठ्या प्रमाणात येऊ घातलेल्या उद्योगांना स्थानिक पातळीवर कुशल कामगार मिळतील, असा विश्वास रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

वेदिक च्यावतीने स्थानिक युवकांच्या कौशल्य विकासासाठी स्थापित करण्यात आलेल्या वेदिक महिंद्रा कौशल्य विकास केंद्राचं आज गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. ऑर्डिनन्स फॅक्टरी अंबाझरी परिसरातील जिल्हा परिषदेच्या शाळेत सुरू करण्यात आलेल्या या अद्यावत सुविधांनी युक्त केंद्राची त्यांनी पाहणी केली.

देशाला पेट्रोल-डिझेलमुक्त करण्याचं आपलं ध्येय असल्याचं सांगत नितीन गडकरी यांनी डिफेन्सच्या लाभाकरिता रिंगरोडवर लवकरच नवीन तंत्रज्ञानाने युक्त 132 आसनक्षमता असलेली ट्रॉली बस सुरू करण्यात येणार असल्याचे सुतोवाच यावेळी केले.

**पंढरपूर आषाढी एकादशी**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांची होणारी अतिरिक्त गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेनं नागपूर-मिरज-नागपूर दरम्यान ४ पंढरपूर आषाढी एकादशी विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार गाडी क्रमांक 01205 नागपूर-मिरज विशेष रेल्वे दि. १४ जुलै रोजी आणि गाडी क्रमांक ०१२०७ विशेष रेल्वे नागपूरहून दि. १५ जुलै रोजी सकाळी ८ वाजून पन्नास मिनिटांनी सुटेल.

परतीच्या प्रवासासाठी गाडी क्रमांक ०१२०६ आणि ०८ या मिरजेवरून नागपूरसाठी रवाना होतील.

या विशेष रेल्वेगाड्यांसाठी आजपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि रेल्वेच्या irctc.co.in या संकेतस्थळावर तिकीट आरक्षित करता येईल.

**आकांक्षित तालुका**

दुर्गम् आणि आदिवासीबहुल भामरागड इथं आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत संपूर्णता अभियानाचा प्रारंभ काल करण्यात आला. त्याअंतर्गत सकाळी शालेय विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी प्रभातफेरी काढली. आरोग्य विभागामार्फत आरोग्य तपासणी करण्यात आली. महिला व बालकल्याण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पोषण आहारासंबंधी स्टॉल लावला. त्यातून अमृत आहार थाळी व इतर स्थानिक पोषक पदार्थांचे सादरीकरण करण्यात आले. गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम यांनी संपूर्णता अभियानाविषयी माहिती दिली. कृषी विभागाने निर्देशकांचे पुढील तीन महिन्यांसाठी प्रगतीचे नियोजन सादर केले,तर शिक्षण विभागाने दोन निर्देशकांची माहिती दिली.

**हवामान**

विदर्भातील सर्व जिल्ह्यांत कालपासून हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत आहे. मागील २४ तासांत गडचिरोली जिल्ह्यातील मुलचेरा इथं ८५ पूर्णांक ४ दशांश मिलीमीटर पावसाची नोंद करण्यात आली. तर चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा इथं ७६ पूर्णांक २ दशांश मिलीमीटर पाऊस नोंदविण्यात आला. परवा ९ तारखेपर्यंत सर्व जिल्ह्यांत पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

#####